नि.फौ.ख.क्र-११८२/२०२२
नि.क्र.२८

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०६ यांचा पुरावा**

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | लिंबराज यादव डोंगरे , |
| वय | - | ५८ वर्षे, |
| व्यवसाय | - | शेती, |
| राहणार | - | वडगाव गुप्ता, ता. जि. अहमदनगर |

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.ठाकुर यांच्यामार्फत सरतपास सुरु**

१. दिनांक ०३.०७.२०२१ रोजी, पोलीसांनी मला सारोळाबद्दी या गावात फिर्यादी गोरख पोपट बोरुडे यांच्या घराजवळ पंच म्हणुन बोलाविले होते. त्यावेळी त्याठिकाणी माझ्यासोबत दुसरे पंच चेतन लांडगे हजर होते. तसेच त्यावेळी त्याठिकाणी पोलीस हजर होते. घटनास्थळ मला फिर्यादीचे वडील पोपट बोरुडे यांनी दाखविले. घटनास्थळी फिर्यादी पोपट बोरुडे हजर होते. घटनास्थळावरुन पोलीसांनी माझ्यासमक्ष एक लोखंडी गज जप्त केला. त्यानंतर पोलीसांनी घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. आता मला सदरील पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२९** देण्यात येते. माझ्यासमक्ष जप्त केलेला लोखंडी गज दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदर गज आर्टिकल 'अ' दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर लावलेल्या कागदी लेबलवर माझी सही आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे वकील श्री. आर.पी.गोरे यांच्यामार्फत उलटतपास सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, मौजे वडगाव गुप्ता ते सारोळाबद्दी यामधील अंतर अंदाजे २५ कि.मी. आहे. मला पोलीसांनी पंच म्हणुन हजर राहण्यासाठी नोटीस दिली नव्हती. दिनांक ०३.०७.२०२१ रोजी मी माझ्या मुलीला भेटण्यासाठी सारोळाबद्दी येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी गोरख बोरुडे माझे व्याही आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शंभुनाथ बोरुडे माझे जावई आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात शंभुनाथ बोरुडे यांच्यासोबत आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, शंभुनाथ बोरुडे यावेळी न्यायालयाच्या आवारामध्ये आहेत. हे म्हणणे खरे नाही की, शंभुनाथ बोरुडे यांनी मला कशी साक्ष द्यावयाची याबाबत सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील जप्ती

पंचनामा तयार करुन त्यावर पोलीसाच्या सांगण्यानुसार मी माझी केवळ सही केली होती.

३. दिनांक ०३.०७.२०२१ रोजी पोलीसांनी मला पंच म्हणुन दुपारी ०३.०० ते ०३.३० वाजण्याच्या सुमारास बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल 'अ' कडील लोखंडी गजावर विशेष खुण नाही. साक्षीदार स्वतः सांगतात की, घटनास्थळावरुन पोलीसांनी जप्त केलेला तोच गज आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर लोखंडी गज कोणाच्या ताब्यातुन जप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जावयास व व्याही यांना मदत व्हावी म्हणुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. माझे व्याही व जावई यांचा आरोपींच्या चुलत्याशी जमिनीवरुन वादविवाद आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

दि.२९.०८.२०२५.
वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष

SACHIN SHIVAJIRAO UBALE
Digitally signed by SACHIN SHIVAJIRAO UBALE
Date: 2025.08.29 17:33:58 +0530

**(एस.एस. उबाळे)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**अहमदनगर.**